MHGA080000702026

**सिरोंचा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सिरोंचा**
**श्री. उन्मेश बा. श्रीराम, यांच्या न्यायालयांत,**
संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३८/२०२६, सरकार .वि. संपत पेद्दांटी,
**निशाणी -०४.**

| आरोपांचा आशय व तपशील | | |
|---|---|---|
| १. | **गुन्हा घडला तारीख** | ११.०२.२०२६ रोजी १३.३८ ते १३.४५ वाजता मौजा-नगरम टि-पॉईंट, सिरोंचा, तालुका-सिरोंचा, जिल्हा-गडचिरोली. |
| २. | **खबर दिल्याची तारीख** | ११.०२.२०२६ |
| ३. | **खबर देणा-याचे नांव** | अजय लेकामी, पोलीस शिपाई, ब.नं.२३०, पोलीस स्टेशन, **सिरोंचा,** जिल्हा-गडचिरोली. |
| ४. | **आरोपीचे नांव** | **संपत्त राजन्ना पेद्दांटी,** वय ३२ वर्षे, व्यवसाय- वाहन चालक, राहणार- रामक्रिष्णापुर, तालुका-सिरोंचा, जिल्हा-गडचिरोली. |
| ५. | **आरोपीत गुन्हे** | |
| | ज्याअर्थी, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, तुम्ही उपरोक्त ठिकाणी तुमचे ताब्यातील वाहन नोंदणी क्र.MH-33-1144 हे वाहन मौजा नगरम टि-पॉईंट, सिरोंचा येथे रोडचे मधोमध उभा करुन येणा-या जाणा-या वाहनास अडथळा होईल असे किंवा इजा होईल असे मौजा नगरम टि-पॉईंट, सिरोंचा येथे रोडवर उभे केले, त्याअर्थी तुम्ही, भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २८५ प्रमाणे गुन्हा केला असा तुमच्यावर आरोप आहे. | |

| | |
|---|---|
| **ता.१४.०३.२०२६.** | **समक्ष** |

**स्वा/-**
**उन्मेश बा. श्रीराम**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सिरोंचा.

| | **आरोपीचे प्रतिकथन/कबुली** |
|---|---|
| **प्रश्न क्र.१** | तुम्हाला दोषारोपांचा आशय समजला काय? |
| **उत्तर** | होय. |
| **प्रश्न क्र.२** | तुम्हाला पोलीस कागदपत्रांच्या नकला मिळाल्यांत काय? |
| **उत्तर** | होय. |

| | |
|---|---|
| **प्रश्न क्र.३** | तुम्हाला विधी सेवा केंद्राकडुन विधीज्ञ सेवा हवी आहे काय? |
| **उत्तर** | नाही. |
| **प्रश्न क्र.४** | तुम्हाला आरोपीत गुन्हे कबुल आहेत काय? |
| **उत्तर** | होय मला गुन्हा कबुल आहे. |

| | |
|---|---|
| **ता.१४.०३.२०२६.** | **समक्ष** |
| स्वा/-<br>............................<br>आरोपी ची सही/अंगठा | **स्वा/-**<br>**उन्मेश बा. श्रीराम**<br>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सिरोंचा. |

**न्यायनिर्णय/आदेश**
(आज तारीख १४.०३.२०२६ रोजी पारित)

१. या खटल्यातील आरोपी आज हजर असुन त्याला मी उपरोक्त गुन्ह्याचा आशय (निशाणी क्र. ०४) आरोपीस त्याच्या भाषेत समजावुन सांगितला आहे.

२. आरोपीने ठामपणे व स्पष्ट शब्दांत त्याचेवरील आरोप मान्य केला आहे. तशी पुरसीस त्याने दाखल केली असुन ती निशाणी क्र. ०२ ला आहे. आरोपी कुठल्याही अगर कोणाच्याही दबावाविना गुन्हा कबुल करीत आहे याची मी खात्री केली आहे.

३. सबब, मी आरोपीचे गुन्ह्याबाबत कबुलीचे प्रतिकथन स्विकारुन आरोपीला भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २८५ प्रमाणे दंडनिय कलमांसाठी दोषी मानत आहे.

४. या गुन्ह्यासाठी जास्तीत जास्त रु. ५,०००/- द्रव्यदंड निर्धारित केलेला आहे. आरोपीने केलेल्या कथनांचा विचार करता आणि कमाल शिक्षेची मर्यादा पाहता, माझ्या मते, पुढील आदेश यथायोग्य आहे.

**आदेश**

१) आरोपी **संपत्त राजन्ना पेद्दांटी** यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ नुसार भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २८५ प्रमाणे दंडनिय गुन्ह्यासाठी दोषी धरण्यांत येत आहे.

२) आरोपीने या गुन्ह्याबाबत रुपये ५००/- (अक्षरी पाचशे रुपये मात्र) इतका द्रव्यदंड अदा करावा, अशी शिक्षा त्यांना फर्मावण्यात येत आहे. दंड न भरल्यास आरोपीने दोन दिवस साधी कैद भोगावी असेही फर्मावण्यात येत आहे.

३) प्रकरण संपले.

Digitally signed by UNMESH BALU SHRIRAM
Date: 2026.03.16 11:27:48 +0530

**(उन्मेश बा. श्रीराम)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सिरोंचा.

ता.१४.०३.२०२६.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी शपथेवर सांगतो की, पी. डी. एफ. न्यायनिर्णय/आदेशामधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णय/आदेशातील मजकुराप्रमाणे शब्द-न-शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | विट्ठल विश्वांभर मिट्ठेवाड<br>लघुलेखक (श्रेणी-३) |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी व फौजदारी न्यायालय,<br>सिरोंचा. |
| न्यायनिर्णय/आदेशाची तारीख | : | १४/०३/२०२६. |
| मा.पिठासीन अधिकारी यांनी न्यायनिर्णय<br>/आदेशावर सही केल्याची तारीख | : | १४/०३/२०२६. |
| न्यायनिर्णय/आदेश अपलोड केल्याची तारीख | : | १६/०३/२०२६. |

Digitally signed by VITHAL VISHWAMBHAR MITHEWAD
Date: 2026.03.16 11:45:23 +0530

(विट्ठल विश्वांभर मिट्ठेवाड)
लघुलेखक (श्रेणी-३)
दिवाणी व फौजदारी न्यायालय, सिरोंचा.